महाराष्ट्र शासन

दुरध्वनी क्रं. - 02462-244474
फॅक्स क्रं. - 02462-235103

नियंत्रण कक्ष क्रं. - 02462-234720
E-mail Id- pronanded@gmail.com

जा. क्रं./ प्रेस नोट / 201 / पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड / 2024 / दिनांक :— 07 / 06 / 2024

# 1)चोरी :—

**1)देगलुर** :— दिनांक 06.06.2024 रोजी 03.43 वा. ते 03.51 वा.दरम्यान, **सरकारी दवाखाना देगलुर ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी व तिचा मुलगा सरकारी दवाखान्यात वार्ड क्रमांक एक मध्ये एडमिट असल्याने यातील फिर्यादी रात्री गाढ झोपले असता त्यांच्या गळयातील सोन्याची चैन किंमती 12,000/—रूपयाची कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी सुनिता राजेंद्र पहिलावार, वय 36 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. मिनकी ता. बिलोली जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलुर** गुरनं 237/2024 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2822 कनकवळे, मो.क्रं. 8830899396** हे करीत आहेत.

# 2)मो.सा.चोरी :—

**मुखेड** :— दिनांक 06.06.2024 रोजी चे सकाळी 04.45 वा. चे सुमारास, फिर्यादीचे घरासमोर वडार गल्ली मुखेड ता. मुखेड **जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची स्कुटी क्रं. एमएच.—26/डीएच—3019 ही घरा समोर लावली असता यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून चोरून नेण्याचा प्रयत्न करीत असतांना मिळुन आले. वगैरे **फिर्यादी लक्ष्मण राजाराम रॅपनवाड, वय 49 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. वडार गल्ली मुखेड ता. मुखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुखेड** गुरनं 174/2024 कलम 379, 511, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2223 कदम, मो. क्रं. 8390695468** हे करीत आहेत.

# 3)गंभीर दुखापत :—

**लिंबगाव** :—दिनांक 06.06.2024 रोजी चे 09.20 वा. चे सुमारास, **मरळक शिवार फिर्यादीचे शेतात ता. जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी व त्यांची पत्नी ही शेतात बोरवेल मशीन घेऊन बोर गाडया शेतात लावत असतांना यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करून तुम्ही शेतात का आलास या कारणावरून शिवीगाळ करून फिर्यादी हा त्याचे मोबाईल मध्ये शुटींग करत असतांना आरोपीतांनी मोबाईल घेवुन फोडुन नुकसान करून शिवीगाळ करून फिर्यादी व साक्षीदार यांना काठीने व लाथा बुक्याने मारहाण केली व फिर्यादीचे तोंडावर आरोपीने बुक्की मारल्याने वरचा दात पाडुन गंभीर दुखापत केली. तसेच साक्षीदार मंजुषा हिचा हात मुरगळला व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी राजेश केशवराव शहाणे, वय 37 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. जंगमवाडी ता. जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे लिंबगाव** गुरन 72/2024 कलम 325, 323, 504, 506, 427, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/706 पवार, मो. नं. 9373545955** हे करीत आहेत.

# 4)विवाहीतेचा छळ :—

**1)मुदखेड** :— दिनांक 10.02.2021 ते 07.05.2023 चे दरम्यान, **फिर्यादीचे राहाते घरी नगरपरिषद मुदखेड ता. मुदखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद तीन आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तुझे माहेरहुन कापड दुकान टाकण्यासाठी दहा लाख रूपये घेवुन ये म्हणुन तिचा शारिरीक व मानसीक छळ करून शिवीगाळ केली. चारित्र्यावर संशय घेवुन लाथा बुक्यांनी मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 26 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुदखेड** गुरनं 92/2024 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री शिंदे मॅडम, मो.क्रं. 9011689025** हे करीत आहेत.

**2)कंधार :—** दिनांक 29.04.2021 चे तीन महिन्यानंतर ते आज 06.06.2024 चे 11.00 वा. चे दरम्यान, **पोलीस कॉलनी कंधार ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील नमुद सहा आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तुझ्या आईकडुन चांगला बिजनेस करण्यासाठी दहा लाख रूपये व फिर्यादीचे पतीस संस्थेवर नौकरी लावण्यासाठी 40 लाख रूपये घेऊन ये म्हणुन तीचा शारिरीक व मानसीक छळ करून आरोपीने जात्याचे दांडयाने फिर्यादीच्या उजव्या डोळयावर, मानेवर, पाठीत मारहाण करून दुखापत केली व डोक्याचे केस उपडुन काढले व अश्लील भाषेत शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 28 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कंधार** गुरनं 178/2024 कलम 498(अ), 294, 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2059 सानप, मो.क्रं. 9421849989** हे करीत आहेत.

## 5)जिवन आवश्यक वस्तु कायदा (ई सी ॲक्ट):—

**इस्लापुर :—** दिनांक 05.06.2024 रोजी चे रात्री 22.50 वा. चे सुमारास, **दत्ता किशन डुकरे माजी सैनिक यांचे घराजवळ मौ. तल्लारी ता. किनवट जि. नांदेड येथे** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररीत्या कृषी भारती फर्टीलायझर्स इंडस्ट्रीज भावनगर कंपणीचे सेंद्रिय खताचे एकुण 41 बॅग किंमती 56,990/—रू चा खत विक्री परवाना व खत विक्री पावती न बाळगता व खताचे बिल न देता खत चोरटी विक्री करीत असतांना मिळुन आला. वगैरे **फिर्यादी श्री शिवराम मारूती मुंडे, 38 वर्षे, व्यवसाय नौकरी कृषी अधिकारी पंचायत समिती एसव्हीएम किनवट,** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इस्लापुर** गुरनं 53/2024 नियंत्रण आदेंश 1985 मधील खंड 19(सी) व अत्यावश्यक वस्तु अधिनियम 1955 चे कलम 3(2)(1) 7 उल्लंघन कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री उमेश भोसले, मो.क्रं. 9552591244** हे करीत आहेत.

## 6)प्राण्यास क्रुरतेने वागणुक :—

**1)अर्धापुर :—**दिनांक 06.06.2024 रोजी चे 16.50 वा. चे सुमारास, **हिंगोली ते नांदेड रोडवरील अर्धापुर बायपास वर ता. अर्धापुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररीत्या महिंद्रा बोलेरो पिकअप वाहन क्रमांक एमएच—27/बीडब्ल्यु—5513 किंमती 4,00,000/—रूपयाचे मध्ये गोवंश जातीचे जनावरे दोन गोरे किंमती 36,000/—रू चे स्वतःच्या आर्थीक फादयासाठी दाटीवाटी कोंबुन क्रुरपणे पायास बांधुन कतलीसाठी नेत असतांना एकुण 4,36,000/—रूपयाचे मुद्येमालासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोनि/श्री चंद्रशेखर आनंदराव कदम, ने. पोस्टे अर्धापुर** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरन 282/2024 कलम 5(अ), 5(ब), 9 सह कलम महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम सह कलम 3, 11(1)(ड),(ई)(एफ), प्राणी छळ प्रतिबंधक अधिनियम प्राण्याचे परिवहन नियम सह कलम 66/192 मोटार वाहन कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2803 राठोड, मो. नं. 7985191916** हे करीत आहेत.

**2)देगलुर :—**दिनांक 06.06.2024 रोजी चे 22.23 वा. चे सुमारास, **मौ. करडखेड ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररीत्या गोवंश जातीचे जनावरे तीन गोरे किंमती 65,000/—रू चे स्वतःच्या आर्थीक फादयासाठी कतलीसाठी खरेदी करून ताब्यात बाळगुन मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/वैजनाथ नागोराव मोटरगे, ने. पोस्टे देगलुर** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे देगलुर** गुरन 264/2024 कलम 5(ब), 9 सह कलम महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम 1976 सुधारणा अधिनियम 2015 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2437 इंगोले, मो. नं. 9423440472** हे करीत आहेत.

## 7)जुगार :—

**भोकर :—**दिनांक 06.06.2024 रोजी चे 13.30 वा. चे सुमारास, **उत्तरवार कॉम्पलेक्स भोकर रेल्वे पटरी जवळ ता. भोकर जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या टाईम बाजार नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 2410/—रूपये जुगाराचे साहित्यासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2196 विश्वनाथ भुजंगराव इंगळे, ने. स्थागुशा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरनं 171/2024 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1173 कानगुले, मो. नं. 9923320555** हे करीत आहेत.

## 8)जळुन मृत्यु :—

**माहुर :—**दिनांक 05.06.2024 रोजी चे रात्री 20.00 वा. चे पुर्वी, **मौ. लखेगाव शिवारातील निलाबाई तुळशीराम राठोड यांचे शेतातील विहीरीजवळ ता. माहुर जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे अनोळखी स्त्री जातीचे प्रेत वय अंदाजे 20 ते 25 वर्षे,** मौ. लखेगाव शिवारातील निलाबाई तुशीराम राठोड यांचे शेतातील विहीरीजवळ जळालेल्या आवस्थेत मिळुन आले. वगैरे **खबर देणार संतोष तुळशिराम राठोड, वय 44 वर्षे, व्यवसाय शेती रा. पापलवाडी ता. माहुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे माहुर** आ. मृ. **10/2024** कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री परगेवार, मो.नं. 9028846691** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड